18 OCT 2017
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**गिरीष चितळे : जागतिक अन्न दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात चर्चासत्र**

# बदलत्या गरजांमध्ये संधी शोधा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** युवा संशोधकांनी लोकांच्या बदलत्या गरजांमध्ये संधी शोधावी. तंत्रज्ञानांच्या साहाय्याने स्थानिक पदार्थांचे जागतिक पातळीवर मार्केटिंग करण्यासाठी विद्यार्थ्यांनी संशोधनात्मक प्रयत्न करावेत, असे आवाहन चितळे डेअरीचे कार्यकारी संचालक गिरीष चितळे यांनी केले.

जागतिक अन्न दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाचा तंत्रज्ञान अधिविभाग आणि कॉन्फिडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीतर्फे (सीआयआय) आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी 'सीआयआय'च्या दक्षिण महाराष्ट्र झोनचे अध्यक्ष योगेश कुलकर्णी होते. 'अन्न प्रक्रिया उद्योगात व्यवसायाची संधी' असा चर्चासत्राचा विषय होता.



शिवाजी विद्यापीठात तंत्रज्ञान अधिविभागाच्या चर्चासत्रात चितळे डेअरीचे कार्यकारी संचालक गिरीष चितळे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी जयदीप बागी, प्रताप पुराणिक, योगेश कुलकर्णी, पल्लवी कोरगावकर उपस्थित होते.

चितळे म्हणाले, आज देशामध्ये बारा ते पंधरा टक्के वाटा हा अन्नप्रक्रिया उद्योगाचा आहे. त्यामुळे या क्षेत्रामध्ये तरुणांना अनेक प्रकारच्या संधी निर्माण झालेल्या आहेत. अन्न प्रक्रिया उद्योगामध्ये विविध प्रकारच्या स्वयंचलित उपकरणांची प्रचंड निकड आहे. कडधान्य, पालेभाज्या, फळे हे आपल्याच देशातील लोकसंख्येला पुरत नाहीत. बऱ्याच ठिकाणी ते पोहोचत नाहीत किंवा खरेदी करता येत नाहीत. त्यासाठी प्रक्रिया उद्योग पुढे येत आहेत. पल्लवी कोरगांवकर यांनी चर्चासत्राच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. यावेळी तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी, ए. के. साहू, प्रताप पुराणिक, उपकुलसचिव डॉ. जी.एस. कुलकर्णी, आदी उपस्थित होते.

## चितळे म्हणाले

- भारतातील लोकांच्या खाण्याच्या गरजा बदलत नाहीत. पद्धती बदलत आहेत.
- मोठी झेप घेण्यासाठी छोट्या-छोट्या गोष्टीमधील गॅप पाहायला हवा आणि त्यातच संधी निर्माण करता आली पाहिजे.
- मालाची गुणवत्ता टिकविणे, साठवणूक आणि वाहतूक करणे यामध्ये प्रचंड संधी निर्माण झाली आहे.
- विद्यापीठ आणि उद्योग यांच्या समन्वयाने विद्यार्थ्यांना अद्ययावत तंत्रज्ञानाची माहिती उपलब्ध होऊ शकते.
- जागतिक पातळीवर टिकण्यासाठी फूड सेफ्टीमध्ये स्वच्छताविषयक जागृती वाढविणे आवश्यक आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 OCT 2017
महाराष्ट्र टाईम्स

# 'ग्लोबल मार्केटिंग करा'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'तंत्रज्ञानाच्या सहाय्याने स्थानिक पदार्थांचे जागतिक पातळीवर मार्केटिंग करण्यासाठी विद्यार्थ्यांनी संशोधनात्मक प्रयत्न करावेत', असे प्रतिपादन चितळे डेअरीचे कार्यकारी संचालक गिरीष चितळे यांनी केले. 'वर्ल्ड फूड डे'च्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठाचा तंत्रज्ञान अधिविभाग व सीआयआय यांच्या संयुक्त विद्यमाने 'अन्न प्रक्रीया उद्योगात व्यवसायाची संधी' या विषयावर चर्चासत्र झाले. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहामध्ये आयोजित केलेल्या अध्यक्षस्थानी सीआयआयच्या दक्षिण महाराष्ट्र झोनचे अध्यक्ष योगेश कुलकर्णी होते.

चितळे म्हणाले, 'देशामध्ये बारा ते पंधरा टक्के वाटा हा अन्न प्रक्रिया उद्योगाचा आहे. या क्षेत्रामध्ये तरुणांना अनेक प्रकारच्या संधी निर्माण झाल्या आहेत. संशोधक विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा उपयोग करुन मालाच्या किंमती कमी करणे व गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत राहण्याची आवश्यकता आहे. अन्न प्रक्रिया उद्योगामध्ये विविध प्रकारच्या स्वयंचलित उपकरणांची प्रचंड निकड आहे. कडधान्य, पालेभाज्या, फळे हे देशातील लोकसंख्येला पुरत नाहीत. बऱ्याच ठिकाणी ते पोहोचत नाहीत किंवा खरेदी करता येत नाहीत. त्यासाठी प्रक्रिया उद्योग पुढे येत आहेत. शेतकऱ्यांचे उत्पादन, त्यावरील प्रक्रिया आणि मार्केटिंग यांचा योग्य ताळमेळ जमल्यास या क्षेत्रामधील तरुणांना प्रचंड उभारी मिळेल.'



गिरीश चितळे



चितळे म्हणाले, 'भारतातील लोकांच्या खाण्याच्या गरजा बदलत नाहीत. पद्धती बदलत आहेत. मालाची गुणवत्ता टिकविणे, साठवणूक आणि वाहतूक करणे यामध्ये प्रचंड संधी निर्माण झालेली आहे. विद्यापीठ आणि उद्योग यांचे समन्वयाने विद्यार्थ्यांना अद्यावत तंत्रज्ञानाची माहिती उपलब्ध होऊ शकते. भारतातील प्रत्येक छोटा व्यापारी आणि उद्योजक हा स्वत:च स्टार्ट अप आहे. हे छोटे व्यापारी दोन-तीन वर्षानंतर व्यवस्थापक ठेवून व्यापार पुढे वाढवण्यासाठी प्रयत्न करीत नाहीत. त्यामुळे सत्तर ते ऐंशी टक्के स्टार्टअप संपून जातात.'

पल्लवी कोरगावकर यांनी चर्चासत्रामागील भूमिका स्पष्ट केली. यावेळी तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी, डॉ. ए. के. साहू, प्रताप नाईक, उपकुलसचिव डॉ. जी. एस. कुलकर्णी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 OCT 2017
पुढारी

# विद्यापीठात पुस्तक वाचन उपक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट यांच्यावतीने १५ ऑक्टोबर रोजी पुस्तक वाचन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस अभिवादन करून उपक्रमास प्रारंभ झाला. यावेळी अधिष्ठाता डॉ. ए.एम. गुरव, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, डॉ. डी.व्ही. मुळे यांच्यासह अनेक शिक्षक आणि विविध अधिविभागांचे विद्यार्थी उपस्थित होते.